# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२१

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### राज्यातील अभियांत्रिकी व इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(१) ११४३ (१८-०३-२०२०). श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी व इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिष्यवृत्ती प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच महाविद्यालयीन संस्थेवर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२४-०२-२०२१) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,

तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी ऑक्टोबर, २०१९ मध्ये देय असलेल्या पहिल्या हप्त्याची ६३३ विद्यार्थ्यांची

तर फेब्रुवारी, २०२० मध्ये देय असलेल्या दुसऱ्या हप्त्याची एकूण ४५६४४ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम, तरतूद उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव देता आली नाही, हे खरे आहे.

(३) या विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधील प्रलंबित थकबाकीची रुपये ७७.३५ कोटी इतकी रक्कम आर्थिक वर्ष २०२०-२०२१ च्या मंजूर तरतूदीतून देण्याबाबत दिनांक २६ ऑगस्ट, २०२० रोजी आदेश निर्गमित केले आहेत. त्याप्रमाणे ही रक्कम महा-डीबीटी पोर्टलच्या माध्यमातून सेंट्रल पूल खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई व ठाणे परिसरातील बंद पडलेल्या कारखान्यांच्या जमिनीवर घरे बांधण्याबाबत

**(२) १६८९ (१८-०३-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई व ठाणे परिसरात तीन ते चार दशकांमध्ये अनेक कारखाने बंद झाले असून कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचा रोजगार गेला असून सदरील बंद पडलेल्या कारखान्यांच्या जमिनीचा वापर परवडणाऱ्या घरांच्या बांधणीसाठी करावा अशी मागणी कामगार संघटनेकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामगारांच्या मागणीनुसार सदरील जागेवर परवडणारी घरे बांधण्याबाबत शासनाने कोणते धोरण आखले आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२०-०४-२०२१) :** (१) अशा प्रकारची मागणी करणारे निवेदन कामगार विभागाकडे तसेच कामगार विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) बंद पडलेल्या/आजारी कारखान्यांच्या जमिनीची विक्री/हस्तांतरण/विकास करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कामगारांची कायदेशीर देणी प्रलंबित नसल्याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची प्रकरणे कामगार विभागाकडे प्राप्त होतात. अशा प्रकरणी कामगारांची कायदेशीर देणी अदा केल्याबाबत खातरजमा करुन त्याबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र संबंधितांना देण्यात येते. त्यानंतर संबंधित प्राधिकरणाची मान्यता घेवून अशा जमिनीचा वापर औद्योगिक प्रयोजनातून निवासी/वाणिज्य प्रयोजनासाठी करण्यात येतो.

तसेच काही आजारी उद्योगांच्या अनुषंगाने सदरचे विवाद राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण (NCLT) यांचेकडे दाखल होतात. अशा प्रकरणी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या (NCLT) आदेशानुसार पुढील कार्यवाही अपेक्षित असते. सदर जमिनीची मालकी खाजगी असल्यामुळे, अशा जमिनीवर कामगारांसाठी परवडणारी घरे बांधण्याबाबत कोणताही निर्णय घेण्याची बाब कामगार विभागाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही, अशी वस्तुस्थिती आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात 'आज के शिवाजी-नरेंद्र मोदी' या पुस्तकांवर बंदी आणण्याबाबत

**(३) १६९३ (१८-०३-२०२०). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तुलना करण्यात आलेल्या 'आज के शिवाजी-नरेंद्र मोदी' या पुस्तकावरुन राज्यातील विविधस्तरावरुन निषेध करुन आंदोलने केल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील पुस्तकावर राज्यात बंदी आणण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२२-०३-२०२१) :** (१), (२) व (३) वाढता जनक्षोम पाहता क्षमा मागून लेखकाने पुस्तक मागे घेतल्याचे केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांनी ट्वीट करुन स्पष्ट केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कर्करोगाच्या रुग्णांसाठी अमरावती विभागात शासकीय रुग्णालय बांधण्याबाबत

**(४) १९८१ (१८-०३-२०२०). डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कर्करोगाच्या रुग्णांची संख्या अधिक असून कर्करुग्णांसाठी अमरावती विभागात एकही शासकीय रुग्णालय नाही आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील रुग्णांना उपचारासाठी मुंबई व नागपूर येथे जावे लागत असल्याने अकोला व अमरावती येथे शासकीय रुग्णालय बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) सद्य:स्थितीत अमरावती येथे संदर्भ सेवा रुग्णालय आणि अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व स्त्री रुग्णालय येथे किमोथेरपीच्या व शस्त्रक्रीया सुविधा दिल्या जातात.

माहे जून, २०२० पर्यंत अमरावती शासकीय रुग्णालय येथे एकूण ५९ रुग्णांना व स्त्री रुग्णालय, अकोला येथे एकूण २६ रुग्णांना किमोथेरपीच्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत व १० कर्करोग रुग्णांवर शस्त्रक्रीया करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आयपीएस पदाच्या रिक्त जागा भरण्याबाबत

**(५) २०६८ (१८-०३-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवर्षी प्रमाणे जानेवारी महिन्यात केंद्रीय गृह विभागाकडून आयपीएस बनलेल्या अधिकाऱ्यांची नावे जाहीर करण्यात येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर्षी मराठी पोलीस अधिकाऱ्यांना आयपीएस होण्याची संधी मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६-२०१७ या वर्षाच्या आयपीएसच्या पदोन्नतीच्या कोट्यातील १७ जागा रिक्त असताना मराठी अधिकारी आयपीएस होण्यापासून वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आयपीएस पदाच्या पदोन्नतीच्या रिक्त जागा भरण्याकरीता केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२४-०२-२०२१) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) केंद्र शासन अधिसूचना दिनांक २५/०५/२०१८ अन्वये निवडसुची सन २०१६ करीता ९, अधिसूचना दिनांक ३०/०९/२०२० अन्वये निवडसुची सन २०१७ करीता ७ व निवडसुची २०१८ करीता १० याप्रमाणे राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची भारतीय पोलीस सेवेत पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आलेली आहे. तसेच निवडसुची सन २०१९ करीता ९ पदे व निवडसुची २०२० करीता ०६ पदे अशी एकूण १५ रिक्त पदे केंद्रीय गृह मंत्रालयाने निश्चित केलेली असून सदर पदांवर अधिकाऱ्यांची निवड करण्याकरीता सविस्तर प्रस्ताव केंद्रिय लोकसेवा आयोगास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील परीक्षा विभागात कोटयवधींचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) २८५१ (०२-०६-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर येथील परीक्षा विभागात कोटयवधीचा गैरव्यवहार झाल्याचे माहे फ्रेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून परीक्षा विभागातील कर्मचारी, अधिकारी आणि संलग्नित महाविद्यालयाची एक साखळी मागील अनेक वर्षापासून विद्यापीठाच्या परीक्षा निधीचा अपहार करीत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी संख्या आणि आलेल्या शुल्काचा ताळमेळ बसत नसल्याने विद्यापीठाचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ मध्ये हिवाळयात झालेल्या अभियांत्रिकी परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांची रोल लिस्ट, पैसे भरण्याची पावती, नियमित विद्यार्थ्यांकडून आलेल्या अर्जाची संख्या आणि शुल्क याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परीक्षा विभागातील संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२६-०२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महाविद्यालयामार्फत परीक्षा शुल्क हे धनाकर्ष/ऑनलाईनव्दारे स्वीकारण्यात येते, परीक्षा विभागात प्रत्यक्ष परीक्षा शुल्क घेतले जात नाही. महाविद्यालयामार्फत आवश्यक परीक्षा शुल्क व विद्यार्थांच्या यादीसह वित्त व लेखा विभागात धनाकर्ष/ऑनलाईनव्दारे जमा केले जाते. परीक्षा शुल्क वित्त व लेखा विभागात जमा करुनच परीक्षेबाबत कार्यवाही घेण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्रास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) २८६२ (०२-०६-२०२०). श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर येथे सन २००७ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्रास शासनाने २३ एकर जमीन देण्याचे आदेश पारित केले होते, परंतु प्रत्यक्षात फक्त १२ एकर जमीन देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेवर इमारतीचे काम पूर्ण करून सन २००९ मध्ये उपकेंद्राचे काम सुरु करून मोजकेच अभ्यासक्रम सुरु करण्यात आले असून उपकेंद्राच्या ताब्यात कमी जमीन असल्याने तेथे शैक्षणिक विस्तार करण्यास अडचण निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुविधा सुध्दा उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदेश पारित केल्याप्रमाणे पूर्ण २३ एकर जमीन विद्यापीठाच्या ताब्यात देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२५-०२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

सदर जागेवर इमारत तयार करुन या इमारतीमध्ये व्यवस्थापनशास्त्र संकुल, तंत्रज्ञान संकुल व सामाजिकशास्त्र संकुल तयार करण्यात आले आहेत. या संकुलामध्ये एकूण १४ विषयांचे अभ्यासक्रम चालू आहेत. तसेच सन २०२०-२०२१ पासून तंत्रज्ञान संकुलामध्ये युजीसीचा बी.व्होक या

अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली आहे. सदर उपकेंद्राचे शैक्षणिक व प्रशासकीय विस्तार व विद्यार्थ्यांकरीता इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता लागणारी जमिनीबाबत विद्यापीठाकडून महसूल व वन विभागाकडे मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिंचले (ता.डहाणू, जि.पालघर) गावात निरपराध साधूंची हत्या झाल्याबाबत

**(८) २८८१ (२९-०५-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विनायकराव मेटे, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.रामनिवास सिंह, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिंचले (ता.डहाणू, जि.पालघर) कल्पवृक्षगिरी उर्फ चिकणे महाराज तसेच त्यांचे शिष्य सुशील गिरी महाराज या दोन साधुसंतासह त्यांचे वाहनचालक निलेश तेलंगडे अशा तिघांची दिनांक १६ एप्रिल, २०२० रोजी रात्रौ १०.०० वाजताच्या सुमारास कुठलीही शहानिशा न करता लाठ्या काठ्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत निर्घुण हत्या करण्यात आली असून, पोलीस प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे सदर हत्येप्रकरणीचा तपास सीबीआयकडे वर्ग करुन सखोल चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री व मा.गृहमंत्री आदींकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू हत्या दिनांक १६ एप्रिल, २०२० रोजी घडली असून याप्रकरणी एफआयआर (F.I.R.) दिनांक १८ एप्रिल, २०२० रोजी उशीराने नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू हत्याकांडाच्या घटनास्थळी पोलीस शस्त्रनिशी उपस्थित असताना व तेथील सरपंच यांनी काही तास सदरहू जमावाचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करुन २ साधुसंतासह त्यांचे वाहनचालकास रात्रौ ०९.०० वाजताच्या सुमारास रितसर पोलिसांच्या वाहनात बसवून त्यांची सुरक्षा

करण्याबाबत सूचित करुनही पोलिसांनी त्यांची सुरक्षा करण्याबाबत कोणतीही काळजी न घेता उलट त्या तिघांना जमावाच्या स्वाधीन केले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू हत्याकांडाच्या घटनेच्या सी.सी.टी.व्ही. फुटेजमध्ये काही स्थानिक प्राधिकरण संस्थेचे पदाधिकारी व काही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते सक्रीय असल्याचे दिसून येत असल्याने, शासनाने त्यांची नावे व पत्ते जाहीर करून त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणीही करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू हत्याकांड प्रकरण सी.बी.आय.कडे वर्ग करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०१-०४-२०२१)** : (१) दिनांक १६/०४/२०२० रोजी श्री.आनंदराव काळे, सहायक पोलीस निरीक्षक हे कासा पोलीस ठाण्यात प्रभारी अधिकारी म्हणून कर्तव्यावर असताना गडचिंचले, चौकीपाडा येथे मोठा जमाव जमला असून त्या जमावातील लोकांनी एक पांढऱ्या रंगाची गाडी रोडलगत पलटी करुन टाकली असून जमा झालेले लोक त्या गाडीमधील तीन इसमांना मारहाण करीत आहेत असा फोन आल्याने श्री.काळे हे त्यांच्या स्टाफसह गडचिंचले चौकीपाडा येथे घटनास्थळी येऊन जमावाला पांगविण्याकरीता आवाहन करीत असताना जमाव हिंसक होऊन त्यांनी पोलीस वाहनांवर दगडफेक केली. जमावाने गाडीतील सुशीलगिरी महाराज व त्यांचे वाहनचालक निलेश तेलंगडे व गाडी बाहेर असलेले कल्पवृक्षगिरी ऊर्फ चिकणे महाराज यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

प्रकरणाचा तपास सी.बी.आय.कडे वर्ग करुन सर्व संबंधित दोषीं विरोधात विनाविलंब कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद व अन्य विविध संस्थांनी शासनाकडे केली आहे.

(२) गुन्हा नोंदविण्यास विलंब झाला हे खरे नाही.

कासा पोलीस ठाणे येथे दिनांक १७/०४/२०२० रोजी २२.५८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु नेटवर्क कनेक्टीव्हीटी नसल्यामुळे सीसीटीएनएस प्रणालीमध्ये सदर गुन्हयाची दाखल तारीख दिनांक १८/०४/२०२० रोजी ६.५९ वाजता अशी आहे. सदर गुन्हयात १०१ आरोपी व ०९ विधीसंघर्ष बालक यांना दिनांक १७/०४/२०२० रोजी ताब्यात घेवून त्यांना कासा पोलीस ठाणे येथे आणून १०१ आरोपी यांना दिनांक १८/०४/२०२० रोजी रात्रौ २.२७ वाजता तपासकामी अटक करुन ०९ विधीसंघर्ष बालक यांना बाल न्यायमंडळ भिवंडी येथे ठेवण्यात आले होते. कासा पोलीस ठाणे येथे दिनांक १७/०४/२०२० रोजी गुन्हा दाखल करुन त्याच दिवशी ११० आरोपींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले. सदर प्रकाराबाबत दाखल गुन्हयाचा तपास अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला असून त्यांनी कासा पोलीस ठाणे, जि.पालघर, गु.र.क्र. ७६/२०२० या गुन्हयामध्ये १२६ आरोपीतांविरुध्द व गु.र.क्र. ७७/२०२० या गुन्हयामध्ये १२६ आरोपीतांविरुध्द दोषारोपत्र मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डहाणू यांचे न्यायालयात दिनांक १५/०७/२०२० रोजी नियत कालावधीत दाखल केले आहे.

(३) मयत दोन साधुसंतासह त्यांचे वाहन चालक या तिघांना पोलिसांनी जमावाच्या स्वाधीन केले ही बाब खरी नाही.

कासा पोलीस ठाण्याचे तत्कालीन प्रभारी अधिकारी सपोनि आनंदराव काळे हे त्यांच्या स्टाफसह घटनास्थळी येवुन जमावाला पांगविण्याचा प्रयत्न करित होते. तरीही जमावाने हिंसक होऊन पोलिसांच्या वाहनांवर दगडफेक केली. तसेच जमावाने सुशीलगिरी महाराज व त्यांचे वाहन चालक निलेश तेलंगडे व गाडी बाहेर बसलेले कल्पवृक्षगिरी ऊर्फ चिकणे महाराज यांना शिवीगाळ करुन मारहाण केली. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

(४) घटनास्थळावर स्थानिक स्वराज्य संस्थेचे काही प्रतिनिधी हे प्रक्षुब्ध जमावास समजावण्याचा व शांत करण्याचा प्रयत्न करत असल्याचे व पोलिसांना मदत करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

(५) कासा पोलीस ठाणे येथे दिनांक १७/०४/२०२० रोजी गुन्हा दाखल करुन त्याच दिवशी ११० आरोपींना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणण्यात आले होते. सदर गुन्हा शासनाच्या आदेशान्वये अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे वर्ग करण्यात आलेला असून त्यांनी कासा पोलीस ठाणे जि.पालघर गु.र.क्र. ७६/२०२० या गुन्ह्यामध्ये १२६ आरोपींविरुध्द व गु.र.क्र. ७७/२०२० नुसार दाखल गुन्हयामध्ये १२६ आरोपींविरुध्द मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी डहाणू यांचे न्यायालयात दिनांक १५/०७/२०२० रोजी नियत कालावधीत दोषारोपपत्र दाखल केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास अद्याप सुरु असून अटक आरोपींविरुध्द विहित वेळेत दोषारोप पत्र दाखल करण्याची तजविज ठेवली आहे.

तसेच सदर प्रकरणामध्ये दोषी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

कासा पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक तथा प्रभारी अधिकारी यांना दिनांक २१/०८/२०२० रोजी शासन सेवेतून बडतर्फ ही शिक्षा देण्यात आली आहे. तसेच एका पोलीस उपनिरीक्षकाला पोलीस उपनिरीक्षक पदाच्या वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर ०२ वर्ष ठेवणे ही शिक्षा देण्यात आली आहे. तसेच १ सहायक पोलीस उपनिरीक्षक व १ पोलीस हवालदार यांना सक्तीने सेवानिवृत्त ही शिक्षा देण्यात आली आहे. तसेच १ पोलीस हवालदार यांना पोलीस हवालदार पदाच्या वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर २ वर्ष ठेवणेही शिक्षा व ३ पोलीस शिपाई यांना पोलीस शिपाई पदाच्या वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर १ वर्ष ठेवणे ही शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच १० पोलीस शिपाई यांना पोलीस शिपाई पदाच्या मुळ वेतनावर ३ वर्ष ठेवणे ही शिक्षा देण्यात आलेली आहे.

वरील कसूरदार यांना दिनांक २६/०८/२०२० रोजी अंतिम शिक्षेचे आदेश बजावण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ग्राम कोराड व नवेगांव येथील सांड नदीवरील पुलाचा स्लॅब कोसळल्याबाबत

**(९) २९५५ (२९-०५-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्राम कोराड व नवेगांव येथील सांड नदीवरील पुलाचा स्लॅब सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व निर्मित ठेकेदाराच्या बेजबाबदारपणामुळे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान कोसळल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलावर कॉलम व स्लॅब टाकण्याचे काम ठेकेदारांनी एकाच वेळी सुरू केले असून केलेले काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे ज्यादिवशी स्लॅब टाकला त्याच रात्री तो कोसळल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अशोकराव चव्हाण (१०-०६-२०२०) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक १५/०३/२०२० रोजी एक स्लॅब निर्माणाधिन अवस्थेत असताना कोसळण्याची दुर्घटना घडली आहे.

(२) हे खरे नाही. पुलाच्या फक्त एका स्लॅबचे कॉक्रिटचे काम करण्यात आले होते. कॉक्रिटचे काम पूर्ण झाल्यानंतर सेटरिंग फेल झाल्यामुळे कॉक्रिट स्लॅब कोसळल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर प्रकरणी दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नागपूर यांच्या मार्फत चौकशी करण्यात आली आहे. विषयांकित प्रकरणी संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांवरती प्रशासकीय कारवाई करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच कंत्राटदाराला काळ्या यादीमध्ये टाकण्याचे चौकशी अहवालानुरुप प्रस्तावित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) २९५९ (२९-०५-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रशांत परिचारक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड निरंजन डावखरे, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक : तारांकित प्रश्न क्रमांक ४७५४६ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात साडेचार वर्षात ११४ रूग्ण मृत्यूमुखी झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मनोरूग्णालयात ३७५ पदे मंजूर असून वर्ग एकचे मनोविकृतीतज्ञ नसून तेथे सर्वच संवर्गातील ३९ टक्के पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात एका रूग्णाचा शवविच्छेदन अहवालात त्याचा गळा आवळून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर प्रादेशिक मनोरुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मनोरुग्णालयात एकूण ३७५ पदांपैकी २१७ पदे भरलेली असून १५८ पदे रिक्त आहेत. मनोविकृतीतज्ञ वर्ग-१ चे एकूण ९ पदे मंजूर असून त्यापैकी ३ पदे भरलेली असून ६ पदे रिक्त आहेत. तसेच एम.डी (मनोविकृती) अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी (गट-अ) ची २ पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यात आलेली आहेत. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत दोन कंत्राटी मनोविकृतीतज्ञ कार्यरत आहेत.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) चौकशीअंती सदर मृत्यू हा वार्डातच उपचार घेत असलेला जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला आरोपी रुग्ण याने केल्याचे आढळून आले आहे. त्यांचे अटकेबाबत जिल्हा सरकारी अभियोक्ता यांचे मार्गदर्शन घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत शासनस्तरावरुन व आयुक्तालयस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

---

## परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(११) २९७४ (२९-०५-२०२०). श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील नोकर भरतीत शासन निर्णयाचा सोयीप्रमाणे अर्थ लावण्यात आल्याने करण्यात आलेल्या नोकरी भरतीत गैरव्यवहार झाल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, परभणी यांनी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवड समितीतील दोषी अधिकारी, कर्मचारी व इतर यंत्रणांनी केलेल्या नियमभंगाची व गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, कृषी विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नोकर भरतीतील गैरव्यवहार प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व यंत्रणा यांच्यावर कारवाई करुन नोकर भरती प्रकरणी अन्याय झालेल्या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२०-०४-२०२१) :** (१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यपीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या भरतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे.
(२) परभणी येथील लोकप्रतिनिधी यांचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(३) जिल्हाधिकारी, परभणी यांच्या प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या स्तरावर समिती गठीत करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तरी, सदर अहवाल प्राप्त झाला असून त्यावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना संकटाशी लढताना महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये समन्वय नसल्याबाबत

**(१२) ३११७ (०२-०६-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विनायकराव मेटे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण, उद्योग, नगरविकास, विधी व न्याय विभागामध्ये समन्वय नसल्याने राज्यातील कोरोनाबाधित रुग्णांची संख्या भारतामध्ये सर्वाधिक असून त्याच काळात सार्वजनिक आरोग्य रुग्णालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्या विभागांमध्ये समन्वय नसल्याने PPE कीटस् खरेदी न करणे तसेच ज्या डॉक्टर्स/परिचारीकांना कोरोनाचा संसर्ग झाला त्यांची योग्य काळजी घेऊन इतर रुग्णांसाठी सार्वजनिक आरोग्य रुग्णालये सुरु ठेवण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने योग्य निर्देश न दिल्यामुळे पंचतारांकीत रुग्णालये बंद झाली व त्यामुळे अनेक कोरोना बाधितांना उपचार मिळू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या प्रशासकीय प्रमुखांची जबाबदारी असताना, त्यांनी ही जबाबदारी पार न पाडल्याने सर्वाधिक कोरोना रुग्णांचा मृत्यू महाराष्ट्रात होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०९-०४-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील सार्वजनिक रुग्णालये बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) हे खरे नाही.

राज्यात कोविड-१९ उपचारासाठी त्रिस्तरीय रुग्णालये व्यवस्था उभारण्यात आली असून प्रत्येक स्तरावर पीपीई कीटस् व इतर आवश्यक साधन सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे. पीपीई किट्सचा केंद्र शासनामार्फत पुरवठा करण्यात येत आहे.

तसेच ज्या रुग्णालयातील आरोग्य कर्मचारी कोरोना बाधित आढळले आहेत त्यांच्या निकट सहवासितांना क्वारंटाईन करणे, रुग्णालये निर्जंतुक करणे अशी कार्यवाही करुन सदर रुग्णालये रुग्णसेवेसाठी खुली ठेवण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे मनोरुग्णालयाच्या जागेच्या बदल्यात तेवढीच जागा व सुसज्ज रुग्णालय बांधून देण्याबाबत

**(१३) ३२४४ (०३-०६-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि मुलुंड दरम्यान नव्या रेल्वे स्थानकाच्या निर्मितीसाठी ठाणे मनोरुग्णालयाचा १४.८३ एकर भूखंडावरील आरक्षणात बदल करण्यात आला असून मनोरुग्णालयाच्या जागेच्या बदल्यात तेवढीच जागा आणि सुसज्ज रुग्णालय बांधून देण्याचे आश्वासन नगर विकास विभागाने आरोग्य विभागाला दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात मनोरुग्णाची वाढती संख्या लक्षात घेता सुसज्ज असे मनोरुग्णालय बांधण्याकरीता आरोग्य विभागाला नगर विकास विभागाने जागा सुचविली आहे काय, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०३-२०२१)** : (१) व (२) ठाणे मनोरुग्णालयाच्या भुखंडावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अंतर्गत मनोरुग्णालय तसेच रेल्वे स्टेशन व बस टर्मिनस असा फेरबदल नगर विकास विभागाने दिनांक १८/०२/२०२० रोजी मंजूर केला आहे. तथापि, त्या बदल्यात तेवढीच जागा देण्याचे अथवा जागेवर सुसज्ज रुग्णालय बांधुन देण्याचे आश्वासन नगर विकास विभागाने आरोग्य विभागास दिलेले नाही अथवा त्यासाठी वेगळी जागा सुचविलेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड पोलीस (ता.खेड, जि.रत्नागिरी) ठाण्याच्या प्रशासकीय इमारत व निवासस्थाच्या बांधणीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) ३२६४ (२९-०५-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील खेड पोलीस वसाहतीची इमारत ब्रिटीशकालीन व जीर्ण होऊन इमारतीची दुरवस्था झाली असल्याने अशा धोकादायक इमारतीत पोलिसांच्या कुटुंबियांच्या वास्तव्यास धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन प्रशासकीय इमारत, पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानासाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक २५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खेड पोलीस ठाण्याच्या प्रशासकीय इमारत व निवासस्थाच्या बांधणीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२४-०२-२०२१) :** (१) खेड पोलीस वसाहतीमध्ये २४ निवासस्थाने ब्रिटीशकालीन असून त्यापैकी ०५ निवासस्थाने जमीनदोस्त झालेली आहेत, ०९ निवासस्थाने जीर्ण व मोडकळीस आलेली आहेत व १० निवासस्थाने डागडुजी करुन वापरात आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) खेड पोलीस ठाणे येथे सेवा निवासस्थानांचे बांधकाम करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्याकडे पाठविण्यात आला असून तो कार्यवाहीधीन आहे. निधी उपलब्धता व प्राधान्यक्रमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) तालुक्यातून जिल्हा सामान्य रूग्णालय अलिबाग येथे उपचारार्थ आणलेल्या महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(१५) ३४४१ (२९-०५-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात कोरोनाच्या संकटाचा सामना करण्यासाठी व रूग्णांवर उपचार करण्यासाठी सर्व त्या सोयी सुविधा उपलब्ध करण्याचे आदेश राज्यातील सर्व शासकीय रूग्णालयांना शासनाकडून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण (जि.रायगड) तालुक्यातून आलेल्या महिलेला पनवेल उपजिल्हा रूग्णालयात दाखल करून न घेता जिल्हा सामान्य रूग्णालय, अलिबाग येथे पाठविल्यामुळे सदर महिला डेंग्यू, हृदयविकार की कोरोनाबाधित आहे हे न समजल्यामुळे रूग्णालयीन कर्मचाऱ्यांमध्ये शंका निर्माण झाल्यामुळे सदर महिलेला खबरदारी म्हणून विलगीकरण केंद्रात हलविण्यात आले परंतु वेळेवर योग्य ते उपचार न मिळाल्याने सदर महिलेचा मृत्यू झाल्याचे माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रूग्णाजवळ जाण्यासाठी जिल्हा रूग्णालयात पीपीई कीटस्, मृत व्यक्ती नेण्यासाठी बॉडी बॅग व शववाहिका उपलब्ध नसल्यामुळे मृतदेह उचलण्यासाठी कोणी पुढे येत नसल्याने प्रशांत नाईक मित्रमंडळाच्यावतीने बॉडी बॅग उपलब्ध केल्यानंतर अलिबाग नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व नगरसेवक अनिल चोपडा यांनी मृतदेह उचलून शवदाहिनीत ठेवून अंत्यसंस्कार केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जिल्हा सामान्य रूग्णालय, अलिबाग येथे सदर मृत व्यक्ती आणि नातेवाईकांची कोरोना टेस्ट घेणे आवश्यक असताना त्यांचे स्वॅब घेण्यासाठी आवश्यक तो तज्ञ कर्मचारी वर्ग तसेच उपचार करण्यासाठी आवश्यक असणारे अनेक प्रकारचे साहित्य उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करुन जिल्हा सामान्य रूग्णालय, अलिबाग हे आवश्यक ते वैद्यकीय सोयी सुविधासह सुसज्ज करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

श्रीमती मुक्ता बळीराम म्हात्रे, वय-४२ वर्षे, मु.आवरा, ता.उरण, जि.रायगड या श्वास घ्यायला त्रास होणे आणि पोटात दुखणे या कारणाने अत्यवस्थ अवस्थेत ग्रामीण रुग्णालय, उरण येथे दिनांक १२/०४/२०२० रोजी

उपचारासाठी आल्या होत्या. त्यांना डेंग्यूसदृष्य लक्षणे ही होती. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना जिल्हा रुग्णालय रायगड (अलिबाग) येथे संदर्भित केले. त्या ठिकाणी त्यांना आय.सी.यू. मध्ये भरती करुन ऑक्सिजन लावण्यात आला, श्वसन विकारासाठी उपचार देण्यात आले. तथापि, या प्रयत्नांना यश आले नाही आणि त्यांचा मृत्यू झाला. उपचारांअभावी त्यांचा मृत्यू झाला, हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

कोविड-१९ साठी आवश्यक साधनसामुग्री पी.पी.ई. किटस व मृतदेहासाठी लागणाऱ्या बॉडी बॅग पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

दिनांक १३ एप्रिल, २०२० रोजी मृतदेहाचा कोविड-१९ साठी स्वॅब घेण्यात आला. शववाहिकेची उपलब्धता नगरपालिका, अलिबाग यांचेवतीने करुन देण्यात आली. यावेळी मृतदेह बॉडीबॅगमध्ये गुंडाळून देण्यात आला होता. मृत व्यक्ती कोविड-१९ संशयित असल्याने मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला नाही. मृतदेह हाताळणाऱ्या व्यक्तींना पी.पी.ई. किट देण्यात आले होते.

(४) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालय, रायगड (अलिबाग) येथे कान, नाक, घसा तज्ञ उपलब्ध आहेत. सदर रुग्णाचा स्वॅब कोविड-१९ साठी निगेटिव्ह आल्याने, त्यांच्या संपर्कातील व्यक्तीचा स्वॅब घेण्यात आला नाही.

(५) कोविड-१९ रुग्णोपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. या कक्षात प्रशिक्षित स्टाफसह ऑक्सिजन सिलेंडर, व्हेंटीलेटरर्स, एक्सरे मशीन आदी व्यवस्था उपलब्ध आहेत. याशिवाय केळुसकर हॉस्पिटल येथे ही ७० खाटांचे विशेष कोविड रुग्णालय कार्यरत आहे. कोविड-१९ संशयित रुग्णाच्या स्वॅब तपासणीची सुविधा जे.जे. हॉस्पिटल येथे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

---

## अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१६) ३५०५ (०३-०६-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील अनेक पदे रिक्त असून उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी ही रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे मागणी करुनही रिक्त पदे भरलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालयातील रिक्त पदांमुळे प्रशासकीय कामाचा अतिरिक्त ताण इतर कर्मचाऱ्यांवर येत असून शेतकऱ्यांकरीता घोषित केलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२१) :** (१), (२) व (३) अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पद | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | उपजिल्हाधिकारी | १२ | ११ | ०१ |
| २ | तहसिलदार | १३ | १२ | ०१ |
| ३ | मंडळ अधिकारी | ५३ | ४५ | ०८ |
| ४ | तलाठी | ३२२ | ३२२ | ०० |

मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल असलेली अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ प्रलंबित असून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार तुर्तास पदोन्नती कोट्यतील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाजेष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात येत आहेत.

अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात येवून शेतकऱ्यांकरीता घोषित केलेल्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत अडचणी निर्माण झालेल्या नाहीत. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी विहित वेळेत पार पाडण्याबाबत आवश्यक ती दक्षता घेण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जासवली (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील रुग्णालयात डॉक्टर्स, नर्सेस तसेच तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याबाबत

**(१७) ३६४१ (०२-०६-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जासवली (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) परिसरातील गोरगरीब जनतेस उत्तम आरोग्य सेवा मिळावी म्हणून जिल्हा परिषदेने २० वर्षापूर्वी १५ खाटांचे ग्रामीण रूग्णालय उभारले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रूग्णालयासाठी लाखो रूपये खर्च करून प्रसुतिगृह, ऑक्सिजनची व्यवस्था, एक्सरे मशीन, प्रयोगशाळा आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून व सुसज्ज इमारत असूनही डॉक्टर्स, नर्सेस तसेच तंत्रज्ञ उपलब्ध नसल्याने रूग्णालयात येणाऱ्या रुग्णांना औषधोपचारापासून वंचित रहावे लागत असून प्रसंगी श्रीवर्धन येथे औषधोपचारासाठी जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रूग्णालयासाठी डॉक्टर्स, नर्सेस, तंत्रज्ञ व अन्य संवर्गातील एकूण किती पदे मंजूर करण्यात आली व त्यापैकी किती व कोणकोणती पदे रिक्त आहेत,
(४) असल्यास, डॉक्टर, नर्सेस तसेच अन्य संवर्गातील कर्मचारी व तंत्रज्ञांची नियुक्ती झाली असतानाही प्रत्यक्षात एकही डॉक्टर व अन्य कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे येथे येणाऱ्या रूग्णांचे हाल होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने रुग्णालयात उपस्थित न राहणाऱ्या डॉक्टर्स, नर्सेस तसेच तंत्रज्ञ यांच्यावर कारवाई करुन रूग्णालय सुस्थितीत चालू राहण्याच्यादृष्टीने तसेच रूग्णांना नियमित व सुरळीत औषधोपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२१) :** (१) हे खरे आहे.

जासवली, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे.

(२) हे खरे नाही.

जासवली येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारार्थ आलेल्या रुग्णांवर कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत योग्य तो औषधोपचार उपलब्ध सुविधेनुसार केला जात आहे. उपचारार्थ आलेला कोणताही रुग्ण रुग्णसेवेपासून वंचित राहत नाही आणि आवश्यकतेनुसार वरिष्ठ पातळीवरच्या रुग्णालयात संदर्भ सेवा देण्यात येते.

(३) जासवली ग्रामीण रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी व दंतशल्यचिकित्सक संवर्गाची ५ पदे मंजूर असून २ पदे भरलेली आहेत व ३ पदे रिक्त आहेत. शुश्रुषा संवर्गातील ७ पदे मंजूर असून ७ पदे भरलेली आहेत. तांत्रिक/प्रशासकीय संवर्गातील ७ पदे मंजूर असून ५ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत. चतुर्थश्रेणी संवर्गातील ८ पदे मंजूर असून २ पदे भरलेली आहेत व ६ पदे रिक्त आहेत.

(४) हे खरे नाही. जासवली ग्रामीण रुग्णालयातील भरलेल्या १६ पदांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून नियमितपणे हजर राहून रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येते.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना वेतन अदा करण्याबाबत

**(१८) ४०८९ (०८-०९-२०२०). श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३६ जिल्ह्यात जवळपास १२ हजार ५०० पेक्षा जास्त सार्वजनिक ग्रंथालये असून त्यात सुमारे २१ हजार कर्मचारी काम करतात, ग्रंथालय संचालनालयातर्फे ग्रंथालयाच्या दर्जानुसार अनुदान दोन टप्प्यात दिले जाते, अनुदानाचा पहिला हप्ता माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अदा करण्यात आला असून दुसरा हप्ता माहे मार्च, २०२० संपण्यापुर्वी मिळणे अपेक्षित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण ग्रंथालयापैकी सात जिल्ह्यातील सुमारे १५ हजार कर्मचाऱ्यांना अनुदान प्राप्त न झाल्याने वेळेत वेतन न मिळाल्यामुळे सदर ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील तीन महिन्यांपासून राज्यातील बंद असलेली सार्वजनिक ग्रंथालये यापुढे किमान ९ ते १२ यावेळेत ग्रंथ देवघेव प्रक्रिया सुरु करण्यासाठी परवानगी दयावी तसेच अनुदान न मिळालेल्या परभणी, लातूर, यवतमाळ, गोंदिया, सिंधुदुर्ग, धुळे आणि मुंबई शहर जिल्ह्यातील ग्रंथालयांचे देय असलेले सुमारे रुपये ३२ कोटी २९ लाख विनाविलंब अदा करण्यात यावे, अशा मागणीचे एक निवेदन मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २० मे, २०२० रोजी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू ग्रंथालयांना देय असलेला अनुदानाचा दुसरा हप्ता माहे मार्च, २०२० संपण्यापुर्वी देण्याबाबत कार्यवाही करुन सदरहू उक्त मागणीबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-०४-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मागील वर्षाचे थकीत अनुदान वितरित करणेबाबत प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. मराग्र-२०२०/प्र.क्र.६०/साशि-५, दिनांक ०३/०८/२०२० अन्वये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचे सन २०१९-२०२० मधील थकीत अनुदान वितरित करण्यास मान्यता देण्यात आली असून संबंधित ग्रंथालयांना ग्रंथालय संचालनालयाकडून अनुदान वितरित करण्यात आले आहे.

ग्रंथालय संचालकांच्या दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये ग्रंथालय सेवा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या नालेसफाईत गैरप्रकार झाल्याबाबत

**(१९) ४०९६ (१६-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने पावसाळ्याला प्रत्यक्ष सुरुवात होण्यापूर्वी ११३ टक्के नालेसफाई केल्याचा दावा केला असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका खाजगी समाजसेवी संस्थामार्फत करण्यात आलेल्या पाहणीमध्ये सदर नालेसफाई फक्त ३० टक्केच करण्यात आल्यामुळे मुंबईत मान्सून पूर्व आलेल्या पावसाळ्यात अनेक नाले भरून आजूबाजूच्या परिसरात पाणी तुंबण्याचे प्रकार घडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मुंबईतील नाल्यांची सफाई न करणाऱ्या दोषी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०३-२०२१) :** (१) "इतिहासात प्रथमच १०० टक्के नालेसफाई" अशा आशयाची बातमी दिनांक १३ जून, २०२० रोजीच्या सकाळ वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विरोधी पक्षनेते यांनी मुंबईतील अनेक नाल्यांची पाहणी केली असता, नालेसफाई योग्यप्रकारे करण्यात आली नसल्याबाबतची तक्रार केली होती.

त्यानुषंगाने त्यांना नाल्यांच्या साफसफाईची नालेनिहाय माहितीची सविस्तर यादी व नाल्यांच्या साफसफाईची छायाचित्रे सादर करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नद्या, नाले व रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या सफाईचे काम पावसाळ्यापूर्वी हाती घेण्यात येते.

सदर कामे प्रस्तावित करतांना, पर्जन्य जलवाहिनीचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत ठेवण्याकरीता नाल्यामधील गाळाची वस्तुस्थिती निहाय पाहणी करुन गाळाचे प्रमाण अंदाजित ठरविण्यात येते. अंदाजित केलेल्या गाळाच्या कामाचे स्वरुपानुसार ७०% गाळ काढण्याचे काम पावसाळ्यापूर्वी करण्यात येते व उर्वरित ३०% गाळ पावसाळ्यामध्ये व तद्नंतर काढण्यात येतो.

त्यानुसार पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह सुरळीत ठेवण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नद्या, मध्यम आकाराचे नाले, रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्या यांमधील निश्चित केलेल्या गाळापैकी ७०% किंवा आवश्यकतेनुसार त्याहून अधिक गाळ काढण्याचे काम पावसाळ्यापूर्वी विहित कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे.

तथापि, काही वेळेस अतिवृष्टी व समुद्राची भरती यामुळे काही सखल भागात काही कालावधीकरीता पाणी साचण्याची परिस्थिती निर्माण होते. अशा परिस्थितीत खबरदाराची उपाययोजना म्हणून महानगरपालिकेमार्फत आवश्यकतेनुसार पावसाच्या पाण्याचे उपसा करणारे पंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. पावसाचे प्रमाण कमी होताच सखल ठिकाणी पाण्याचा निचरा जलदगतीने होतो असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाची दुरुस्ती करण्याबाबत

**(२०) ४११४ (१७-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाचे दोन वर्षापूर्वी करण्यात आलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये परिसरात असलेल्या ३० इमारतीपैकी १२ इमारती धोकादायक असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दोन वर्षापासून मंजूरीसाठी शासनाकडे प्रलंबित असल्याने सातशेहून अधिक रुग्णांना धोकादायक इमारतीमध्ये उपचार घ्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षभरापासून प्रादेशिक मनोरुग्णालयात मनोविकृती तज्ञांची सहा पदे मंजूर असून एकही पद भरले गेले नसल्याचे तसेच रुग्णालयातील इतर विभागात सोयी सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाची दुरुस्ती करणे, रिक्त पदे भरणे व अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे यांच्या मार्फत मनोरुग्णालयातील इमारतीची पाहणी करुन स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले आहे. प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे येथील ७३ इमारतीपैकी १२ इमारती धोकादायक असून धोकादायक इमारतीपैकी ७ इमारती पुरुष विभागातील व ५ इमारती स्त्री विभागातील आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

मनोरुग्णालयातील धोकादायक ठरलेल्या इमारतीतील रुग्णांना इतर विभागात स्थलांतरीत करण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील मनोविकृती तज्ञ वर्ग-१ ची सहा पदे रिक्त आहेत. तथापि, सद्या इतर रुग्णालयातील मनोविकृतीतज्ञ व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत २ मनोविकृतीतज्ञांच्या सेवा मनोरुग्णालयासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. तसेच इतर विभागात सोयी सुविधा उपलब्ध आहेत.

(४) व (५) ठाणे प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या दुरुस्ती प्रस्तावासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या तांत्रिक अभिप्रायाच्या अनुषंगाने आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून सुधारीत प्रस्ताव मागविण्यात आला आहे. रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही शासनस्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर सुरु आहे. तसेच मनोरुग्णालयात इतर अद्ययावत सोयी सुविधा देण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## वर्धा येथील जय महाकाली शिक्षण संस्था चालविणाऱ्या संचालकांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१) ४१२८ (१५-०७-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.सुरेश धस, श्री.निलय नाईक, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा येथील जय महाकाली शिक्षण संस्था/नवदुर्गा शिक्षण संस्था व सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शंकर अग्निहोत्री व सचिन अग्निहोत्री यांनी Univ/Dte/Msbte अधिकाऱ्यांच्या संगनमताने मागील १५ ते २० वर्षापासून वेगवेगळे बोगस महाविद्यालये एकाच परिसरात सुरु केले आहे, तसेच संस्थेमध्ये आर्थिक गैरव्यवहार करुन राज्यभरात CBSE शाळा विकत घेवून जनतेची फसवणूक केल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेच्या संचालकांनी नागपूर, चंद्रपूर, वर्धा, पुणे, मुंबई व राज्यातील इतर शहरात शाळा विकत घेतल्या असून एकाच जागेचे कागदपत्र दुसऱ्या महाविद्यालयाला दाखविणे, एकच शिक्षक २/३ महाविद्यालयात दाखविणे, OBC/NT/SBC तसेच OPEN विद्यार्थ्यांना SC प्रवर्गात दाखविणे व त्यांची शिष्यवृत्ती घेणे इत्यादी गैरप्रकार करुन संस्थेच्या कारभारात गैरपध्दतीने १० ते १५ वर्षात अब्ज रुपयांची अवैध संपत्ती मिळविल्याच्या अनेक तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संस्थेच्या संचालकांनी बोगस विद्यार्थी, बोगस महाविद्यालयांच्या परवानगी, बोगस प्राचार्य व इतर बऱ्याच बोगस गोष्टी दाखवून सन २००१ ते २०१९ पर्यंत जवळपास २० वर्ष आदिवासी व समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्तीच्या निधीचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, बल्लारशाह येथील कस्तुरबा कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज ह्या महाविद्यालयाला सन २००९-२०१० मध्ये परवानगी नसताना तत्कालीन समाजकल्याण अधिकारी श्री.बरगे व शिष्यवृत्ती लिपिक श्री.डोंगरे यांच्याशी शंकर अग्निहोत्री यांनी संगनमत करुन रुपये ८० लाखांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी सदर महाविद्यलयातील संचालक मंडळावर गुन्हे दाखल करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल-मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदर संस्थेच्या संचालक मंडळाच्या गैरकारभाराची एजी किंवा ईडी संस्थेकडून तपास व चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०४-०३-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) विशेष चौकशी पथकाने एकूण ११ महाविद्यालयांची तपासणी केली आहे. त्यामध्ये सदर संस्थेच्या महाविद्यालयाचा समावेश नाही. सन २००९-२०१० ते २०१८-२०१९ या कालावधीत सदर संस्थेच्या महाविद्यालयास शिक्षण शुल्क, परीक्षा फी व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आलेली आहे. केवळ शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ मध्ये सदर संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयातील एकूण ०६ विद्यार्थ्यांना रुपये ७९,१८३/- एवढी शिष्यवृत्ती अदा करण्यात आली असून तद्नंतरच्या कोणत्याही शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली नाही असे आदिवासी विभागाने अभिप्राय दिलेले आहेत. तर सदर महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये रुपये ७४,०४,१४९/- शिष्यवृत्ती तदर्थ अनुदान स्वरूपात देण्यात आलेली होती. तथापि, सदरची रक्कम संबंधित संस्थेकडून शासनाच्या खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे असे अभिप्राय सामाजिक व न्याय विभागाने दिलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घाणेघर (ता.विक्रमगड, जि.पालघर) गावात पूल उभारण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२२) ४१३७ (१७-०७-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाणेघर (ता.विक्रमगड, जि.पालघर) येथील नागरिक तसेच विद्यार्थ्यांना पुलाअभावी वाहत्या ओहळयातून गळापर्यंतच्या पाण्यात उतरून प्रवास करावे लागत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील वर्षी एक शाळकरी मुलगी वाहून जात असताना ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे तिला वाचविण्यात आले, तसेच ग्रामस्थांनी पुलाच्या उभारणीसाठी स्थानिक प्रशासन, शासकीय कार्यालयामध्ये अनेकदा मागणी करूनही शासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुमारे २ हजार लोकवस्ती असलेल्या आदिवासी गावात पूल उभारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०३-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) याबाबतची कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.
(३) घाणेकर हे गाव भोपोली गावास खालीलप्रमाणे २ रस्त्यांनी जोडले आहे -
१) राज्यमार्ग क्र.७३ व इतर जिल्हा मार्ग क्र.७७ व्दारे १० कि.मी. लांबीच्या रस्त्याने.
२) चाबके तलावली मार्गे इतर जिल्हा मार्ग क्र.७७, ग्रामीण मार्ग ७७ व प्रमुख जिल्हा मार्गाव्दारे ९ कि.मी. लांबीच्या रस्त्याने.

सदर गावे ही दोन्ही बाजूने रस्त्याने जोडले असूनही घाणेकर गावातील लोक भोपोली गावास जाण्यासाठी कमी अंतर असलेल्या ५ कि.मी. च्या अवर्गीकृत पायवाटेचा उपयोग करतात. घाणेघर ते भोपोली ही पायवाट वन जमिनीतून जात असून सदर पायवाटेवर अंदाजे २५.०० मी.रुंदीचा नाला आहे. या ठिकाणी साकव बांधणे आवश्यक आहे. तथापि, सदरची जमीन वन विभागाच्या हद्दीत असल्यामुळे याबाबत जिल्हा परिषदेस पुढील कार्यवाही करता येत नाही.
(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## गोरेगाव, मुंबई येथील सिध्दार्थ रुग्णालय बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२३) ४१६५ (१४-०९-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव, मुंबई येथील सिध्दार्थ रुग्णालयाची जुनी इमारत पाडून नवीन अद्यावत रुग्णालय बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच नवीन अद्यावत रुग्णालयाच्या उभारणीस किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सिध्दार्थ रुग्णालयाचा आणि त्यालगतच्या म्हाडाच्या भूखंडाचा एकत्रित विकास करुन त्याठिकाणी तळमजला+११ अशा सुसज्ज इमारतीचे आराखडे तयार करण्यात आले आहेत.

सदर रुग्णालय हे म्हाडा प्राधिकरणाच्या भूखंडावर असून, सदर इमारतीच्या आराखड्याच्या मंजूरीचा प्रस्ताव म्हाडा प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर इमारतीची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

तसेच सदर कामाचा बांधकाम कालावधी साधारण ३० महिने इतका अपेक्षित असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) ४४१८ (०८-०९-२०२०). श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात मनुष्यबळाअभावी वाहनधारक, सामान्यांची कामे वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून उप प्रादेशिक अधिकारी व वाहन निरीक्षक आदींची पदे भरण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर समस्या सोडण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२९-०४-२०२१) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी हे पद सद्य:स्थितीत रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जालना यांचेकडे सोपविण्यात आला आहे. तसेच परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक २१/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद येथील सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांची सेवा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड येथे वर्ग करण्यात आली आहे.

मोटार वाहन निरीक्षक, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गाची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची बाब कार्यवाही खाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(२५) ४८१७ (१४-१२-२०२०). श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये मंजूर आराखड्यापेक्षा वाढीव बांधकाम करणाऱ्या विकासकांविरुध्द कारवाई करून अतिक्रमणे निष्कासित करण्याची मागणी मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये शासनाला व मुंबई महानगरपालिकेला केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १० वर्षात अतिक्रमणाच्या एकूण किती तक्रारी मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झाल्या असून अद्यापपावेतो किती अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) माहे जानेवारी, २०१० ते ऑक्टोबर, २०२० या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व २४ विभागामध्ये एकूण १,५०,१६३ तक्रारी प्राप्त झाल्या असून, ६९,११५ अनधिकृत बांधकामांना नोटीसा देण्यात आल्या आहेत.

तसेच, १६,१४२ प्रकरणे मा.न्यायालयात व इतर बाबींकरीता प्रलंबित असून, ४८,१३७ अनधिकृत बांधकामे कायदेशीर प्रक्रिया करुन निष्कासित करण्यात आली आहेत.

उर्वरित प्रकरणामध्ये पुढील कायदेशीर कार्यवाही सुरु असून, सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदरची अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येणार आहेत.

याबाबतची माहिती “आरईटीएमएस” या संगणक प्रणालीत “तक्रारी” या शीर्षकाखाली Removal of Encroachment येथे अद्ययावत करण्यात येते.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सन १९६० पासून सन २०२० पर्यंतची उपग्रह छायाचित्रे मान्यता प्राप्त संस्थेकडून प्राप्त करुन घेण्याकरीता तसेच छायाचित्रांव्दारे वेक्टर लेअर तयार करुन घेण्याकरीता निविदा मागविण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली आहे.

तसेच, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सिव्हिल अपील क्र. ७६२७/२०१९ मधील दिनांक २४/१०/२०१९ च्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील परिसरामध्ये जीआयएस मॅपिंग करण्याकरीता निविदा मागविण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली आहे.

माहे मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मा.उच्च न्यायालयाच्या सुमोटो रिट याचिका (एसटी) क्रमांक ९३४३२/२०२० मधील आदेशानुसार, कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर दिनांक ३१ जानेवारी, २०२१ पर्यंत बांधकामांवरील निष्कासन कारवाई स्थगित करण्यात आली होती. तथापि, दिनांक ३१ जानेवारी, २०२१ नंतर अनधिकृत बांधकामांवर योग्य ती कारवाईस सुरुवात झाली आहे.

तसेच, सर्व सहायक आयुक्तांना अनधिकृत बांधकामांवर नियमितपणे निष्कासन कारवाई करण्याचे आदेश दिनांक २९/१२/२०२० रोजी दिले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२६) ४८६० (२३-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.परिणय फुके** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केंद्र शासनाच्या निधीतून अंमलबजावणी होत असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कायम नियुक्त्या देण्याच्या नावाखाली कोट्यावधी रुपयांची अनियमितता होत असल्याची बाब मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना लिहिलेल्या पत्रात केली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून उमेदवारांकडून १ रुपये सहमती पत्र आणि ५०० रुपये लढा निधी घेऊन अर्जावर स्वाक्षरी घेतली जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात सार्वजनिक आरोग्य विभागातील आरोग्य अधिकारी, डॉक्टर, परिचारीका, वार्डबॉय व तंत्रज्ञासह अन्य संवर्गातील २९ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत एकूण ५६ हजार ५६० नियमित मंजूर पदे असून त्यापैकी १७ हजार ३३७ पदे गेल्या अनेक वर्षापासून भरण्यात आलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १९ हजार ७५२ पदे भरण्याचा निर्णय झाला असताना यातील १२ हजार ५७४ पदे भरली नसून रिक्त पदांमुळे गोरगरिब व अतिदुर्गम भागातील रुग्णांना उपचारापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कोरोना सारख्या परिस्थितीमध्ये वैद्यकीय सेवा देणाऱ्या खाजगी डॉक्टरांना शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एन.एच.एम.) मंजूर करण्यात आलेल्या १९ हजार ७५२ पदांपैकी १२ हजार ५७४ पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये कायम नियुक्त्या देण्याच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची अनियमितता करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करुन सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१५-०४-२०२१) :** (१) मा.विरोधी पक्षनेते यांनी तक्रार केली हे खरे आहे. उमेदवारांकडून निधी घेण्याबाबतची चौकशी जिल्हास्तरावर करण्यात येत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील नियमित पदांपैकी १६९९३ आणि कंत्राटी पदांपैकी १३१५२ अशी एकूण ३०१४५ पदे रिक्त आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागात एकूण ५६६५२ पदे मंजूर असून त्यापैकी ३९४५९ इतकी पदे भरलेली असून १६९९३ पदे रिक्त आहेत.
(४) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत एकूण ३९,६३८ पदे मंजूर असून २६,४८६ पदे भरलेली आहेत व १३१५२ पदे रिक्त आहेत व त्यातील ६६६६ पदे राखीव आहेत. सदरील पदे कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार वितरित करण्यात येत असल्यामुळे ती रिक्त दर्शविण्यात येतात.
(५) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत निव्वळ कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येते. शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाचे धोरण नाही.
पदे न भरण्याची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत. :-

१) राज्यस्तरावर राखीव पदे

२) मानधन कमी असल्याने उमेदवार नियुक्ती नाकारतात.

३) डॉक्टर्सची कमतरता.

(६) कायम नियुक्त्या देण्यासंदर्भातील तक्रारीस अनुसरुन दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल करणेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना कळविण्यात आले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागातील नियमित पदभरतीची पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अभियानांतर्गत मंजूर कंत्राटी पदे तात्काळ भरण्याबाबत जिल्ह्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## राज्यातील कस्तुरबा गांधी विद्यालयातील शिक्षकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी देण्याबाबत

**(२७) ४८७८ (१३-१२-२०२०). श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक २२६ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकूण किती कस्तुरबा गांधी विद्यालय सुरु आहेत, त्यामध्ये सध्या कार्यरत असलेल्या शिक्षक-कर्मचार्यांची एकूण संख्या किती आहे,

(२) असल्यास, सदरहू शिक्षकांना मानधनाऐवजी वेतनश्रेणी द्यावी या मागणीबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-०४-२०२१) :** (१) राज्यात एकूण ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय सुरु आहेत, त्यामध्ये सध्या कार्यरत असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची एकूण संख्या १६२ आहे.
(२) व (३) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील शिक्षकांना भारत सरकारकडून एकक दरानुसार एक वर्षाचे ठोक मानधन मंजूर करण्यात येते. वेतनश्रेणी देण्याबाबत केंद्र शासनाचे निकष नाहीत. सदरील विद्यालयातील शिक्षकांची कंत्राटी पध्दतीने ठोक मानधनावर नियुक्ती करण्यात येत असल्याने वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रश्नच उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बाळकुम (जि.ठाणे) येथे म्हाडाने बांधलेल्या गृह प्रकल्पातील सोडत विजेत्यांना घरांचा ताबा मिळण्याबाबत

**(२८) ४९४६ (२०-११-२०२०). श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बाळकुम (जि.ठाणे) येथे म्हाडाने बांधलेल्या गृह प्रकल्पातील सोडत विजेत्यांना इमारतीत पार्किंगची सोय नसल्यामुळे ठाणे महापालिकेने 'ओसी' दिलेली नाही, परिणामत: आजमितीस मागील अडीच वर्षापासून प्रत्यक्षात घरांचा ताबा मिळालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गृह प्रकल्प उभारताना त्यातील प्राथमिक अत्यावश्यक सोई सुविधांची पूर्तता न करणे ही बाब म्हाडाने बांधलेल्या गृह प्रकल्पातील सोडत विजेत्यांना ग्राहकांना त्रासदायक ठरत असल्यामुळे यासंपूर्ण प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली तसेच सदरहू सोडत विजेत्यांना विनाविलंब घरांचा प्रत्यक्ष ताबा देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (१६-०३-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुख्य अधिकारी, कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार, बाळकुम, जि.ठाणे येथील कोकण मंडळाच्या प्रकल्पातील इमारत क्र.१ व २ च्या नकाशांना शहर विकास विभाग ठाणे महानगरपालिकेने सन २०१४ मध्ये दिलेल्या मंजूरीमध्ये कार पार्किंगसाठी १२४ पार्किंगची तरतूद होती. त्यानुसार इमारत क्र.१ चे बांधकाम सुरु करण्यात आले. तथापि, सदर प्रकल्पातील इमारत क्र.१ व २ यांच्या एकत्रित सुधारित नकाशांना दिनांक २७/०२/२०१९ अन्वये मंजूरी देताना कार पार्किंगसाठी ४४१ पार्किंग लागू केले आहे. अशा पार्किंगचा अतिरिक्त आर्थिक भार लाभार्थ्यांवर येऊ नये यासाठी सदर पार्किंग रद्द करण्याबाबत ठाणे महानगरपालिकेकडे कळविण्यात आले आहे. त्यामुळे तसेच, कोविड-१९ च्या महामारीचा लॉकडाऊन व निर्बंधामुळे विलंब झाला आहे.

इमारत क्र.१ च्या रहिवास प्रमाणपत्रासाठी (Occupation Certificate) शहर विकास विभाग, ठाणे यांच्याकडे दिनांक २७/०२/२०२० रोजी कोकण मंडळाने अर्ज केला असून ठाणे महानगरपालिकेकडे याप्रकरणी तसेच, सदर गृह प्रकल्पातील पार्किंग, जलजोडणी, भोगवटा प्रमाणपत्रासाठी ठाणे महानगरपालिकेकडे कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) इमारत क्र.१ चे बांधकाम पूर्ण झाले आहे. परंतु २०१९ च्या सुधारीत नकाशामधील कार पार्किंग टॉवर, मलनिस्सारण प्रक्रिया यंत्रणा व संबंधित आवश्यक इतर सामाईक सुविधा बनविण्याकरीता लागणारा कालावधी, तसेच, मार्च, २०२० पासून कोविड-१९ महामारीच्या लॉकडाऊन/निर्बंधामुळे असलेला कामगारांचा तुटवडा इ.मुळे विलंब होत आहे.

त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाकरीता पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत ठाणे महानगरपालिकेला कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाकडून कळविले असता सदर गृहनिर्माण परिसरात मर्यादित पाणीपुरवठा असल्याने आवश्यक पाणीपुरवठ्यासाठी अतिरिक्त जलवाहिनी टाकण्यात येत असल्याबाबत ठाणे महानगरपालिकेने कळविल्यामुळे जलजोडणीस विलंब होत आहे.

---

## राज्यातील प्रादेशिक आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२९) ४९६२ (२५-११-२०२०). श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन विभागांतर्गत १५ प्रादेशिक अधिकाऱ्यांपैकी ७ पदे रिक्त, तर ५५ उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांपैकी १२ पदे रिक्त असल्याचे दिनांक ७ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रादेशिक आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांची निम्मी म्हणजेच ४०% हून अधिक पदे रिक्त असल्याने कार्यालयातील ८०% कर्मचारी व अधिकाऱ्यांवर एकाच वेळी दोन कामांचा भार येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्ग १ ते ४ मध्ये ५१०० पदांना मंजुरी देण्यात आली तसेच ३११९ पदांवर अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली असून १९८१ पदे रिक्त असल्याने सदर रिक्त पदांबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाकडून वरिष्ठ संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याचा प्रस्ताव शासनाला पाठविला असून यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू रिक्त पदांसाठी कधीपर्यंत भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (२०-०४-२०२१) :** (१) मोटार वाहन विभागांतर्गत प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची एकूण १६ पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे भरलेली व ६ पदे रिक्त आहेत. तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची एकूण ५६ पदे मंजूर असून त्यापैकी ५१ पदे भरलेली व ५ पदे रिक्त आहेत.

(२), (३) व (४) मोटार वाहन विभागात गट-अ ते गट-ड संवर्गात एकूण ५१०० पदे मंजूर असून त्यापैकी ३२४१ पदे भरलेली व १८५९ पदे रिक्त आहेत. पदोन्नतीमधील मागास प्रवर्गाचे आरक्षण या न्यायालयीन प्रकरणामुळे शासनाने दिनांक २९/१२/२०१७ चे पत्रानुसार पदोन्नतीमध्ये मागास प्रवर्गाची पदे रिक्त ठेवावीत आणि फक्त खुल्या प्रवर्गातील पदे भरावीत असे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार फक्त खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची बाब कार्यवाही खाली आहे. तसेच सहायक मोटार वाहन निरीक्षक संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. दरम्यान रिक्त असणाऱ्या पदांवर अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदिवली (मुंबई) येथे अद्ययावत रुग्णालय उभारण्याबाबत

**(३०) ५००३ (१४-१२-२०२०). श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चांदिवली (मुंबई) येथील रुग्णालयाचे आरक्षण असलेल्या न.भू.क्र. ११अ/४ हा १०,००० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर अद्यावत रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे आणि प्रस्तावाबाबतची सद्य:स्थिती काय आहे, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे चांदिवली येथे सीटीएस क्रमांक ११ए/४ या दहा हजार चौरस मीटर क्षेत्रफळाच्या भूखंडावर रुग्णालयासाठी उपलब्ध क्षेत्रफळानुसार नियोजन करुन २५० रुग्णशय्येचे माध्यमिक आरोग्य सेवा पुरविणारे उपनगरीय रुग्णालय प्रस्ताविण्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे.

सदर रुग्णालयासाठी आवश्यक त्या माध्यमिक आरोग्य सेवा सुविधा अंतर्भूत असणारे आराखडे महानगरपालिका वास्तुशास्त्रज्ञ व आरोग्य सल्लागार यांचेमार्फत तयार करण्यात येत आहेत.

तद्‌नंतर महानगरपालिकेच्या आरोग्य पायाभूत सुविधा कक्षामार्फत निविदा प्रक्रिया राबवून स्थापत्य आणि यांत्रिकी व विद्‌युत कामासाठी ठेकेदारांची नियुक्ती करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## जायकवाडीच्या उर्ध्व भागात नव्या धरणांना मान्यता न देणेबाबत

**(३१) ५३१२ (२३-११-२०२०). श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा जनता विकास परिषदेने दाखल केलेल्या जनहित याचिका क्रमांक १७३/२०१३ नुसार मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार सन २००४ नंतर जायकवाडीच्या उर्ध्व भागात नव्या धरणाना मान्यता देण्यात येऊ नये असे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश असूनही जायकवाडीच्या उर्ध्व भागात नाशिक जिल्ह्यातील काही प्रकल्पांना मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन दिला जात आहे, त्याचा तपशील काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१७-०३-२०२१) :** (१) होय.

(२) जनहित याचिका क्र. १७३/२०१३ नुसार मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानंतर नाशिक जिल्ह्यात नवीन प्रकल्पांना मंजूरी देण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घरकुलांना शासन स्तरावरून निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२) ५३१४ (१४-१२-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० मधील मंजूर घरकुलांना शासनस्तरावरून निधी उपलब्ध करुन न दिल्याने लाभार्थ्यांना निधी देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांना निधी देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२६-०२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाचा प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना या योजनांचा निधी प्राप्त असून हा निधी पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत रमाई आवास योजनेचा निधी प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे येथील मनोरुग्णालयाची जागा हस्तांतरीत न करता मनोरुग्णालयासाठी वापरण्याबाबत

**(३३) ५३७१ (१७-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मनोरुग्णांची संख्या वाढत असून रुग्णांची मानसिक वैफल्यातून आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले असताना नवीन मनोरुग्णालयाची निर्मिती करण्याऐवजी ठाणे जिल्ह्यात सन १९०१ मध्ये बांधण्यात आलेल्या मनोरुग्णालयाची जागा ही अन्य प्रयोजनासाठी वापरण्याकरीता व त्याचे हस्तांतरण करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मनोरुग्णालयाची जागा अन्य प्रयोजनासाठी वापरण्याकरीता व त्याचे हस्तांतरण करण्याचे प्रस्तावित करण्याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, ठाणे मनोरुग्णालयाची एकूण जागा किती असून त्याचा वापर कशाप्रकारे होत आहे तसेच मनोरुग्णांची वाढती संख्या विचारात घेता ठाणे येथील मनोरुग्णालयाची जागा ही अन्य प्रयोजनासाठी हस्तांतरीत न करता मनोरुग्णालयासाठी वापरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (०६-०४-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेने विस्तारीत ठाणे रेल्वे स्थानकासाठी ठाणे मनोरुग्णालयाची जागा हस्तांतरण करण्यासाठी पत्रव्यवहार केलेला आहे.

सदर प्रस्तावासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिति गठीत करण्यात आली होती. सदर समितीने सद्य:स्थितीतील मनोरुग्णालयाचे महत्व लक्षात घेता, मनोरुग्णालयाचे हक्क अबाधित ठेवून कार्यवाही संदर्भात अहवाल सादर केला असून, सदर अहवाल मा.उच्च

न्यायालयासमोर सादर करण्यात आला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर महसूल व वन विभाग व नगर विकास विभागाचे अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(३) प्रादेशिक मनोरुग्णालयाची ७/१२ नोंदीनुसार एकूण ७१.३८ एकर व मालमत्ता पत्रकानुसार ६५.५७ एकर इतकी जागा आहे. सदर जागेचा मनोरुग्णालय, अधिकारी/कर्मचारी यांचे निवासस्थाने, ट्रेनिंग सेंटर, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, आरोग्य परिवहन/प्रयोगशाळा/स्टोअर्स इत्यादीसाठी वापर होत आहे. सद्य:स्थितीत जागा हस्तांतरणाचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वळणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविणेबाबत

**(३४) ५४५९ (१४-१२-२०२०). श्री.रामदास कदम :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वळणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (०७-०४-२०२१) :** (१) दापोली लघु औद्योगिक क्षेत्र विकसित करण्यासाठी दापोली तालुक्यातील मौजे वळणे येथील १६.१४ हे.आर. क्षेत्र संपादीत करण्यात आले असून महामंडळाने लहान मोठ्या आकारमानाचे भूखंड आरेखित करून त्यांचे वाटप उद्योजकांना केले आहे.

वळणे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळच्या लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्राप्त झालेला नाही. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी लघु वसाहतीचे क्षेत्र वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात बिंदूनामावलीनुसार प्राध्यापक पद भरती करण्याबाबत

**(३५) ५४८६ (१८-११-२०२०). डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश कराड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुदानित विविध वरिष्ठ महाविद्यालयात अनेक वर्षांपासून प्राध्यापक पद भरती प्रलंबित असल्याने सहायक प्राध्यापकांची पदे रिक्त असून राज्यातील नेट, सेट, पीएचडी, पात्रताधारकांमध्ये असंतोष निर्माण झाल्यामुळे राज्यातील पात्रताधारकांनी शासनाला सहाय्यक प्राध्यापक पद भरती सुरू करण्यासंदर्भात सातत्याने निवेदने पाठवून मागणी केली आहे, तसेच अनुसूचित जमातीची बिंदू नामावली डावलून राज्यात सहाय्यक प्राध्यापकांची अनेक पदे इतर प्रवर्गातून भरल्यामुळे एसटी प्रवर्गाच्या २० हजार पदांचा अनुशेष शिल्लक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०२० मध्ये व तद्पूर्वी विद्यापीठांच्या परिक्षांचा आढावा घेण्यासाठी अनेक विद्यापीठाचा दौरा केल्यानंतर दिनांक १६ सप्टेंबर, २०२० रोजी वरिष्ठ महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक पद भरती तात्काळ सुरू करण्यासंदर्भात राज्यातील आठ लोकप्रतिनिधींसह उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिव व उच्च पदस्थ अधिकारी यांच्या मुंबई येथे आयोजित केलेल्या बैठकीत पद भरती प्रक्रिया तात्काळ सुरू करण्यासंदर्भात मागील ४० टक्के भरतीमधील शिल्लक असलेली सहाय्यक प्राध्यापकांची सुमारे २५०० रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी एका महिन्यात कार्यवाही करण्यात यावी असा निर्णय घेतला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी ४० टक्के पद भरतीची घोषणा केली असताना २०० पॉईंट रोस्टर लागू करण्याच्या हालचाली सुरू असून संधी न मिळालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना भरतीपासून वंचित राहावे लागणार आहे, तसेच, सदरहू बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची एक महिन्यांचा कालावधी होवूनही अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, महाराष्ट्रात सन १९९० पासून सहायक प्राध्यापक भरतीसाठी विषयनिहाय आरक्षण लागू करण्यात आले, मात्र काही संघटनांकडून केंद्रीय विद्यापीठांच्या धर्तीवर संवर्गनिहाय २०० पॉईंट रोस्टर लागू करण्याचा आग्रह धरला जात आहे, तसेच केंद्र शासनाने दिनांक ९ जुलै, २०१९ रोजी हा कायदा केवळ केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालयांसाठी केल्यामुळे महाराष्ट्रातील विद्यापीठात व शिक्षण संस्थांत संवर्गनिहाय रोस्टर लागू करण्याची मागणी चुकीची असल्याचे मत फेडरेशनचे केंद्रीय अध्यक्ष प्रा.मधुकर उईके यांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्राध्यापक भरतीची चौकशी अनुसूचित जाती जमाती आयोगाने सुरु केली असल्याची माहिती दिनांक २२ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली असून सध्या अस्तित्वात असलेल्या १०० बिंदूनामावलीनुसारच विषयनिहाय प्राध्यापक पद भरतीत ओबीसी, एससी, एसटी, व्हीजेएनटीची पदे भरण्याचा क्रमांक आला असून आता २०० पॉईंट रोस्टर लागू झाल्यास या मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यता असल्याने नवी रोस्टर पध्दती लागू करू नये, अशी मागणी ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बिंदूनामावलीनुसार ४० टक्के भरतीमधील शिल्लक असलेली सहायक प्राध्यापकांची २५०० रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०३-०३-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दिनांक ०१/१०/२०१७ रोजीच्या विद्यार्थी संख्येच्यावर आधारीत पदांच्या आढाव्यानुसार सहाय्यक प्राध्यापकांच्या रिक्त पदांच्या ४० टक्के पदभरतीस काही अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाच्या दिनांक ०३/११/२०१८ शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

सद्य:स्थितीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत वित्त विभाग, शासन निर्णय, दिनाक ०४/०५/२०२० अन्वये पद भरतीवर

निर्बंध आणलेले आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित तसेच सदर भरती प्रक्रियांतर्गत असणारी पदे न भरल्यास होणारा परिणाम लक्षात घेता, सदरहू खंडीत झालेली भरती प्रक्रिया सुरू करण्याकरीता आवश्यक त्या सर्मथनासह प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला आहे.

(३) व (४) हे अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक ०७/०३/२०१९ च्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व शिक्षण संस्थांमधील शिक्षकीय पदांचे आरक्षण धोरण विहित केलेले असून त्यानुसार शिक्षकीय पदांच्या सरळसेवा भरतीसाठी संवर्गनिहाय आरक्षण लागू आहे. केंद्र शासनाने विहित केलेले आरक्षण धोरण राज्यातील अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकीय पदांच्या सरळसेवा व विषयनिहाय आरक्षण धोरण, यासंदर्भात न्यायप्रविष्ट असलेली न्यायालयीन प्रकरणे इ. बाबी विचारात घेऊन केंद्र शासनाच्या धर्तीवर आरक्षण धोरण निश्चित करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(५) हे अंशतः खरे आहे.

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक पदाच्या भरतीमध्ये बिंदूनामावलीचे पालन न झाल्याचे तक्रार निवेदन महाराष्ट्र अनुसूचित जाती जमाती आयोगाकडे केले असून, त्यानुषंगाने सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश संचालक, उच्च शिक्षण यांना देण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महसूल विभागातील गाव कामगार तलाठ्यांच्या निवासाबाबत

**(३६) ५५२९ (१३-१२-२०२०). श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागाचे गाव पातळीवरील कर्मचारी गाव कामगार तलाठ्यांनी ज्या गावात कार्यरत आहे तेथेच निवासी असणे बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गावामध्ये कार्यरत गावात निवासी नसणाऱ्या किती गाव कामगार तलाठ्यावर कारवाई करण्यात आली आहे,

(३) असल्यास, गाव कामगार तलाठ्यांनी खाजगी व्यक्तींना मदतनीस म्हणून कार्यालयात कामाला ठेवू नये असा आदेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०१-०४-२०२१) :** (१) ज्या सज्जाच्या ठिकाणी तलाठी यांना शासनाने निवासस्थाने उपलब्ध करून दिलेली आहेत, त्यांनी त्या निवासस्थानामध्ये राहणे बंधनकारक आहे.
(२) ज्या सज्जाच्या ठिकाणी तलाठी यांना शासनाने निवासस्थाने उपलब्ध करून दिलेली आहेत, अशा ठिकाणी जे तलाठी निवास करत नाहीत अशा ८३ तलाठ्यांच्या वेतनातून घरभाडे भत्ता कपात करण्याची कारवाई करण्यात आली आहे.
(३) होय.
(४) व (५) महसूल व वन विभाग, पत्र क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.४७५/ई-१० दिनांक ०६ जानेवारी, २०१७ अन्वये सज्जावरील तलाठ्यांच्या उपस्थितीबाबत तसेच इतर सर्वसमावेशक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

---

## अकोला महानगरपालिकामध्ये चौदाव्या वित्त आयोगांतर्गत विविध विकास कामात अनियमिततेबाबत

**(३७) ५८०० (२०-११-२०२०). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेमध्ये चौदाव्या वित्त आयोगामध्ये आयोगांतर्गत विविध विकास कामासाठी गत तीन वर्षात जवळपास १८५ कोटी रुपये प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधीचा विनियोजन कोणतेही कायदेशीर ठराव न घेता करणे, शासनाच्या निकषाबाहेर निधीचा वापर करणे तसेच महानगरपालिकेत ऐनवेळी प्राप्त होणाऱ्या प्रकरणांवर खर्च करण्यास मान्यता देवून निधीचे

वितरित करणे इत्यादी बाबींविषयक तक्रार पत्र देवून महानगरपालिकेला अवगत करण्यात येवूनही दोषींवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०४-२०२१) :** (१) होय, खरे आहे.

चौदाव्या वित्त आयोगांतर्गत सन २०१५-१६ ते २०१९-२० या वर्षात रुपये १८५,००,४०,८७९/- एवढे अनुदान प्राप्त झालेले आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

चौदाव्या वित्त आयोगाच्या निधीच्या वित्तीय विनियोगाबाबत शासनाकडून वेळोवेळी प्राप्त शासन निर्णयास अनुसरुन तसेच अकोला महानगरपालिकेचे महासभने मंजूर केलेल्या ठरावानूसारच उपरोक्त निधीचा विनियोग करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे टेमघर व अंजुर (ता.भिवंडी, जि.ठाणे) या ठिकाणी तलाठी यांनी चुका दुरुस्ती करण्याबाबत

**(३८) ५८६२ (१३-१२-२०२०). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टेमघर व अंजुर (ता.भिवंडी, जि.ठाणे) या ठिकाणी महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये तलाठी यांनी चुका दुरुस्ती करणेबाबत मनीषा भालचंद्र म्हात्रे आणि इतर ग्रामस्थ यांनी दिनांक १८ फेब्रुवारी, २०१९ रोजी व अबू बकार मोमीन यांनी दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांना अर्ज दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अर्ज दिल्यानंतर एक वर्ष उलटूनही संबंधित तहसिलदार यांनी कुठल्याही प्रकारची कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये तलाठी यांनी चुका दुरुस्ती करणेबाबत कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, टेमघर व अंजुर येथील महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ अन्वये शासनस्तरावरून निर्णय होण्यास किती कालावधी अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२७-०४-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे टेमघर, ता.भिवंडी येथील स.नं. १२५ व इतर या मिळकती संदर्भातील फेरफार क्रमांक ३९७ व ४०१ नोंद होऊन ७० वर्षाचा कालावधी झालेला आहे. तद्नंतर, सदर मिळकतींचे त्रयस्थ व्यक्तींकडे हस्तांतरण झाले असल्यामुळे संबंधितांनी सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक असल्याचे तहसिलदार, भिवंडी यांनी संबंधितांना कळविले आहे.

मौजे अंजूर, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. ८६८पै या मिळकती संदर्भातील फेरफार क्रमांक ८४६, दिनांक १०/१०/२०१८ पाहता सदर मिळकतीचे त्रयस्थ व्यक्तींकडे हस्तांतरण झाल्याचे दिसून येते.

तसेच, मौजे अंजूर, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. ८७४ नवीन स.नं. ४२पै च्या अधिकार अभिलेख सदरी दुरुस्ती करणेसाठी आवश्यक नोंदी घेणेबाबत अधिकार अभिलेख नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उपविभागीय अधिकारी, भिवंडी यांना कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## भूकंपमापन वेधशाळेतील उपकरणे बंद पडल्याबाबत

**(३९) ५८९० (१४-१२-२०२०). डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूगर्भातील हालचालीचा वेध घेण्यासाठी राज्यात उभारलेल्या ३५ पैकी जवळपास २३ भूकंपमापन वेधशाळेतील उपकरणे बंद पडल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपकरणे बंद पडण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सध्या पालघर भागात भूकंपाचे सातत्याने धक्के बसत असतानाही भूकंपमापन वेधशाळेतील उपकरणे बंद आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भूकंपमापन उपकरणे दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०५-०३-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील ३५ भूकंपमापन वेधशाळेतील उपकरणे जुने/कालबाह्य झाल्यामुळे तसेच सुटेभागांची उपलब्धता होत नसल्यामुळे बंद पडत असून सद्य:स्थितीमध्ये ३५ पैकी २५ भूकंपमापन उपकरणे विविध तांत्रिक कारणामुळे बंद पडलेले आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

पालघर परिसरात वाढत्या भूकंपीय घडामोडीचा विचार करता IM, दिल्ली ने ०५ व NGRI, हैद्राबाद ने ०६ भूकंपमापन उपकरणे पालघर मध्ये बसविलेली आहेत.

(४) महाराष्ट्र राज्यातील धरण स्थळांवरील भूकंपमापक केंद्रे व तेथील उपकरणांचा आढावा व आधुनिकीकरणाबाबत समितीचे गठण केलेले होते. त्यानुषंगाने समितीने अहवाल शासनास सादर केलेला असून अहवाल अंतिम केल्यानंतर अद्यावतीकरणाचे व आधुनिकीकरणाबाबतचे नियोजन केले जाईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(४०) ५९९६ (२४-११-२०२०). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतून माहे सप्टेंबर, २०२० मध्ये अत्यल्प रुग्णांवरच उपचार केल्याची बाब दिनांक २५ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे सप्टेंबर, २०२० मध्ये दोन लाखाहून अधिक रुग्ण विविध रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून उक्त योजनेंतर्गत रुग्णांवर उपचार करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने रुग्णांना उपचार न देणाऱ्या रुग्णालयावर कारवाई करुन रुग्णालयात दाखल होणाऱ्या सर्व रुग्णांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत उपचार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०३-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सप्टेंबर, २०२० मध्ये खाजगी अंगीकृत रुग्णालयांमध्ये ४६७१८ उपचार झालेले आहेत. तसेच दिनांक २१ मार्च, २०२० पासून सप्टेंबर, २०२० पर्यंत खाजगी अंगीकृत रुग्णालयात २६२५५४ उपचार झालेले आहेत.

(२) हे खरे नाही.

सप्टेंबर, २०२० मध्ये खाजगी अंगीकृत रुग्णालयामध्ये ४६७१८ मोफत उपचार झालेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील आरे वसाहतीत पर्यटन विकास महामंडळामार्फत आंतरराष्ट्रीय दर्जाचे मत्स्यालय उभारण्याबाबत

**(४१) ६००७ (१८-११-२०२०). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीतील सुमारे १४४ एकर भूखंडावर पर्यटनाच्या दृष्टीने विविध प्रकारच्या योजना राबविण्याचा शासनाचा विचार असून याच परिसरात सुमारे पाच एकर भूखंडावर जगभरातील पर्यटकांसाठी आकर्षण अशा रीतीने आंतरराष्ट्रीय पातळीवरील मत्स्यालय उभे करण्याचे ठरविण्यात आले, त्याची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळावर सोपविण्यात आली असून त्यासाठी सुमारे ५०० ते ८०० कोटी रुपये खर्च येणे अपेक्षित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे, योजनेचे काम केव्हा सुरु करण्यात येणार आहे तसेच त्यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे, सदरहू योजनेची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.आदित्य ठाकरे (२४-०२-२०२१) :** (१) व (२) मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन संकुलाची निर्मिती करण्याचे प्रस्तावित असून जागेच्या उपलब्धतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील पोलीस स्टेशनच्या जागेबाबत

**(४२) ३७३१८ (०४-०१-२०१८). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १८०९३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे) येथे पोलीस स्टेशनच्या जागेसाठी आरक्षण असतानाही नयानगर येथे रस्त्यावर आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मिरा-भाईंदर शहराच्या नवीन विकास आराखड्यानुसार पोलीस स्टेशनचे आरक्षण रद्द करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा व वाढत्या गुन्हेगारीचा विचार करता पोलीस स्टेशनसाठी आरक्षित असलेल्या १८४अ नंबर या जागेवर पोलीस स्टेशनची उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-०३-२०२१) :** (१) मौजे भाईंदर स.क्र.४८२पै, ४९३पै, ४९६पै ही जागा आरक्षण क्र.१८४अ "पोलीस स्टेशन" करीता आरक्षित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी आरक्षण क्र.१८४अ "पोलीस स्टेशन" या आरक्षणाने बाधित २००० चौ.मी. क्षेत्र मिरा-भाईंदर महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांना दिनांक २६/०८/२०१६, दिनांक ३०/१०/२०१६, दिनांक ०६/१२/२०१७ व दिनांक १४/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविले असून पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पर्यटन विकास आराखडा राबविण्याबाबत

**(४३) ३७७६७ (०४-०४-२०१८). श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ८०७२ कोटी रुपयांचा पर्यटन विकास आराखडा राबविण्यात येणार असून त्यापैकी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान १७४७ कोटी रुपये खर्चाच्या विकास आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पर्यटन विकास आराखड्याचे स्वरुप काय आहे व मंजूर आराखड्यातून कोणती कामे करण्यात येणार आहेत,
(३) उर्वरित रकमेच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत व त्यास मंजूरी देण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.आदित्य ठाकरे (२०-०४-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आधुनिक वैद्यकीय सुविधेकरीता महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी स्थापन केल्याबाबत

**(४४) ४१५७८ (०२-०८-२०१८). ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कामगारांना वैद्यकीय उपचारांसह आधुनिक वैद्यकीय सुविधा सुलभतेने उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीची स्थापना माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विमा सुविधेसाठी सदर सोसायटीमध्ये कामगार व शासकीय कर्मचारी यापैकी कोणत्या कामगारांना समाविष्ट करण्यात येणार आहे, तसेच सदर विमा सोसायटीचे नियम, अटी किंवा निकष कोणत्या प्रकारचे आहेत, याबाबत शासनाने प्रस्ताव सादर केला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०३-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) राज्य कामगार विमा अधिनियम १९४८ अन्वये केंद्र शासनाच्या राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्या मार्फत राज्य कामगार विमा योजना राबविली जात असून सदर योजनेंतर्गत नोंदणीकृत विमाधारकांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. सदर वैद्यकीय सेवा अधिक सुलभतेने व

परिणामकारकरीत्या पुरविण्यात याव्यात याकरीता संस्था नोंदणी अधिनियम १८६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० या अधिनियमाखाली महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी (बीएड) देण्याबाबत

**(४५) ४६६९२ (०६-०७-२०१९). श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४४७६३ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक शाळेतील कार्यरत व सेवानिवृत्त शिक्षकांना प्रशिक्षित समजून नियुक्ती दिनांकापासून त्यांना पदवीधर प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी (बीएड) देण्यात यावी, या शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील शिक्षकांनाही हे लाभ देण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजी निर्गमित करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जाती, भटक्या जमातीच्या आश्रमशाळेतील शिक्षकांना दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती वित्तीय तरतूद करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (३१-०३-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

दिनांक २८ एप्रिल, २०१४ च्या शासन निर्णयान्वये शासन मान्यताप्राप्त व अनुदानित विजाभज प्राथमिक आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर बी.एड शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे.

सदर शासन निर्णय हा अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांना लागू करण्यात आलेला नाही.
(२) दिनांक २८ एप्रिल, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळेतील शिक्षकांना प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी लागू झाल्यानंतर देय असलेले लाभ विजाभज प्रवर्गाच्या शिक्षकांसाठी असलेल्या वेतनाच्या लेखाशीर्षामधून अदा करण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या महापौर निधीचे लेखापरिक्षण करण्याबाबत

**(४६) ४६९५० (१२-०७-२०१९). श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील तसेच राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल रुग्ण आणि नैसर्गिक आपत्ती किंवा आगीसारख्या दुर्घटनांमधील जखमींना आर्थिक मदत पुरविणाऱ्या महापौर निधीचे गत दहा वर्षात लेखापरिक्षण झाले नसल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेत महापौर निधीची समिती नेमण्यात आली असून या समितीत किती सदस्य आहेत व या निधीत किती रक्कम शिल्लक आहे,
(३) असल्यास, घटनेनुसार महापौर निधी समितीमध्ये आमदार, खासदार, समाजातील नामवंत व्यक्ती, वृत्तपत्रांचे संपादक, पालिकेचे लेखापाल अशी कमाल ५०० सदस्यांची मिळून समिती असते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गत अनेक वर्षांपासून महापौर निधी समितीची एकही बैठक आयोजित करण्यात आली नसून या निधीचे लेखापरिक्षण न करण्याची कारणे काय आहेत तसेच महापौर निधीमधून आतापर्यंत कोणकोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०४-२०२१) :** (१) हे खरे नाही असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) महापौर निधी समिती जास्तीत जास्त ५०० सदस्यांची असून, महापौर निधी समितीच्या कार्यकारी समितीमध्ये अध्यक्षांसह एकूण ३१ सदस्य आहेत.

महापौर निधीमध्ये कायम मुदत ठेव रुपये २.०१ कोटी व बचत खात्यामध्ये दिनांक ०५/०२/२०२१ पर्यंत रुपये १४.९५ लाख इतकी रक्कम शिल्लक आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महापौर निधी समितीची सर्वसाधारण सभा दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ रोजी आयोजित करण्यात आली होती. तथापि, माहे मार्च, २०२० पासून असलेल्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे महापौर निधी समितीची पुढील सर्वसाधारण सभा निश्चित करण्यात आलेली नाही.

सन २०१२-१३ ते सन २०१८-१९ पर्यंतचे महापौर निधी लेखापरिक्षणाचे काम प्रक्रियेमध्ये असून, महापौर निधीतून हृदय शस्त्रक्रिया, मुत्रपिंडरोपण, डायलेसीस, कर्करोग आणि इतर मोठ्या शस्त्रक्रियांसाठी वैद्यकीय मदत रुग्णांना देणे अद्यापपर्यंत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व्दारा शिष्यवृत्तीपासून विद्यार्थी वंचित असल्याबाबत

**(४७) ४७६४६ (०५-०७-२०१९). श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठव्दारा शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन महाडीबीटी ह्या पोर्टलवर असून विविध शाखेच्या परिक्षार्थ्यांचे अर्ज सादर होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्ज सादर न होण्यामागील कारणे काय आहेत, तसेच हयाबाबत परीक्षा नियंत्रक प्र.कुलगुरू यांच्या अंतर्गत वादामुळे विद्यार्थी वर्गास त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकारामुळे सुमारे दिड लाख विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित होणार असल्याने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विद्यापीठाव्दारा संचालित शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालये तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमाची माहिती व त्याकरीता आकारण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची माहिती महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यासाठी महाडीबीटी आय.टी. विभागाकडे सादर केली होती. परंतु, अद्यापही/आज दिनांकापर्यंत महाडीबीटी कार्यालयाव्दारा विद्यापीठाशी संबंधित अभ्यासक्रमाची व त्यांच्याशी संबंधित शुल्काची माहिती संकेतस्थळावर अदययावत करण्यात आलेली नाही. त्यामुळे महाविद्यालयातील विविध शाखेच्या परीक्षार्थ्यांचे अर्ज सादर होत नाहीत. याबाबत माहिती तंत्रज्ञान विभागास तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच परीक्षा नियंत्रक व प्र.कुलगुरू यांच्या अंतर्गत वादामुळे विद्यार्थी वर्गास त्रास होत आहे, ही बाब खरी नाही.
(३) विद्यापीठाव्दारा संचालित शैक्षणिक विभाग आणि महाविद्यालयातील एकही विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित नाही. तथापि, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी संकेतस्थळावर सादर होत नसल्यामुळे आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे व उपआयुक्त, समाज कल्याण, नागपूर विभाग यांना विद्यापीठाकडून पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत

**(४८) ४७९३९ (१२-०७-२०१९). श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात अजूनही २० लाख मुंबईकर पाण्यापासून वंचित असल्याचे पाणी हक्क समितीचे समन्वय श्री.सीताराम शेलार यांनी जागतिक जल दिनांच्या निमित्ताने जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षभरात पाच हजार कुटुंबांनी एक हजार अर्ज पाण्यासाठी भरले असताना फक्त १० ठिकाणीच पाणी आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहरातील पाणी समस्या सोडविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१२-०४-२०२१) :** (१) यासंदर्भात कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पाणी समस्या सोडविण्याकरीता माहे जुलै, २०१९ ते जानेवारी, २०२१ या कालावधीत नवीन जलजोडणी देण्याकरीता प्राप्त अर्जांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:

**<u>शहर विभाग</u>**

शहर विभागात मान्यताप्राप्त नळ कारागीरामार्फत झोपडपट्टी विभागात नवीन उभा खांब (स्टॅण्ड पोस्ट) या पध्दतीची नवीन जलजोडणी देण्याकरीता २९०९ अर्ज प्राप्त झाले आहेत,

त्यापैकी विहित अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या १९४७ अर्जांना परवानगी प्रपत्रे देण्यात आली असून, परवानगी प्रपत्रातील नमूद बाबींची पूर्तता केलेल्या १३७७ रहिवाशांच्या गटांना जलजोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित ५७० परवानगी प्रपत्रातील बाबींची पूर्तता रहिवाशांच्या गटांनी अद्यापपर्यंत केलेली नसल्यामुळे त्यांना जलजोडणी देण्याची कार्यवाही

करण्यात आलेली नाही. तसेच एकूण प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ४७० अर्जांची पडताळणी करण्यात येत असून, ४९२ अर्जदारांना उचित कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी कळविण्यात आले आहे.

**पूर्व उपनगरे**

पूर्व उपनगरे विभागातील रहिवाशांच्या गटांकडून मान्यताप्राप्त नळ कारागीरामार्फत नवीन जलजोडणी देण्याकरीता २२१७ अर्ज प्राप्त झाले असून, विहित अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या १९४१ अर्जांना परवानगी प्रपत्रे देण्यात आली आहेत व उर्वरित २३७ अर्जदारांना तांत्रिक बाबी पूर्ण करण्यासाठी कळविण्यात आले आहे. तसेच दुसऱ्या ठिकाणी जलजोडणीतील सदस्य असलेल्या ३९ अर्जदारांचे जलजोडणी अर्ज रद्द करण्यात आले आहेत.

**पश्चिम उपनगरे**

पश्चिम उपनगरे विभागातील रहिवाशांच्या गटांकडून मान्यताप्राप्त नळ कारागीरामार्फत नवीन जलजोडणी देण्याकरीता ९१३६ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी विहित अटी व शर्तींची पूर्तता केलेल्या ६८३९ अर्जांना परवानगी प्रपत्रे देण्यात आली असून, त्यापैकी परवानगी प्रपत्रातील नमूद बाबींची पूर्तता केलेल्या ६६९२ रहिवाशांच्या गटांना जलजोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित १४७ रहिवाशांच्या गटांनी अद्यापपर्यंत परवानगी प्रपत्रातील बाबींची पूर्तता केलेली नसल्यामुळे जलजोडणी देण्याबाबतची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तसेच, एकूण प्राप्त झालेल्या अर्जांपैकी ६४६ अर्जांची पडताळणी करण्यात येत आहे व २१७ अर्ज त्यांची कागदपत्रे ग्राह्य नसल्याने नामंजूर करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे उचित कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी १४३४ अर्जदारांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्‌यापीठात प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४९) ४९०८६ (०५-०७-२०१९). श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात संज्ञापन, पत्रकारिता, सामाजिक शास्त्र, विधी अशा विविध अभ्यासक्रम विभागातून मिळून प्राध्यापकांची ५६ टक्के पदे रिक्त असल्याचे माहे मे, २०१९ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठात विद्यार्थ्यांची संख्या वाढत असून अनेक विभागामध्ये पूर्ण वेळ पुरेसे प्राध्यापक नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२६-०२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) शासन निर्णय, दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठांना मंजूर पदांच्या ८० टक्के इतक्या मर्यादेत पद भरती करण्यास मंजूरी देण्यात आलेली असून त्यानुसार पदभरती प्रक्रियेची कार्यवाही मुंबई विद्यापीठाकडून सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे (पू.) येथील अनुसया को.ऑप.हौसिंग सोसायटी येथील दुकानदारांना पर्यायी जागा व आर्थिक मोबदला देण्याबाबत

**(५०) ४९३४४ (०५-११-२०१९). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे (पूर्व) कोपरी, चेंदणी येथील अनुसया को.ऑप.हौ. सोसायटी लि., मंगला हायस्कूल समोर असलेल्या इमारतीला व्ही.जे.टी.आय.सी. (२अे) व ठाणे महापालिकेकडून दुरुस्ती करणे योग्य असा अहवाल देण्यात आले असूनही सदर अधिकृत इमारतीला जाणून-बुजून अतिधोकादायक ठरवून पाडण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमधील दुकानदार (गाळेधारक) यांना प्रचलित नियमानुसार पर्यायी जागा देणे व गाळेधारकाशी करार करणे हे बंधनकारक असतानाही विकासकाने दुकानदार (गाळेधारक) यांना कोणताही आर्थिक मोबदला न दिल्यामुळे दुकानदारांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीमधील दुकानदार (गाळेधारक) यांना विकासकाकडून पर्यायी जागा देवून झालेल्या नुकसानीचा आर्थिक मोबदला देण्याबाबत तसेच सदर विकासकावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०३-०३-२०२१) :** (१) ठाणे (पुर्व) कोपरी, चेंदणी येथील अनुसया को.ऑप. सोसायटी लि., या इमारतीची (तळ + ३ मजली) सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे :-

- सदर इमारत ठाणे महानगरपालिकेकडून धोकादायक घोषित करण्यात आली होती.
- सदर इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये भिन्नता आढळून आल्याने सदर इमारतीचे व्ही.जे.टी.आय. मार्फत स्ट्रक्चरल ऑडिटमध्ये करण्यात आले.
- तथापि, स्ट्रक्चरल ऑडिट हे इमारतीमधील तळ मजल्यावरील व्यापारी गाळयांपुरते मर्यादित होते.
- सदर इमारत अतिधोकादायक स्थितीत असल्याने संपूर्णपणे निष्कासित करण्यात आली आहे.
- मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सदर इमारतीवर ठाणे महानगरपालिकेने कारवाई करू नये म्हणून दिलेल्या आदेशाबाबत रहिवाशांनी याचिका दाखल केली होती.
- सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळली असून याचिकाकर्ता यांना रुपये २५,०००/- दंड ठोठावण्यात येऊन सदर याचिका निकाली काढण्यात आली होती.

- सदर अतिधोकादायक इमारत निष्कासित करण्याची महानगरपालिकेने कार्यवाही केलेली आहे.

(२) व (३) सदरची बाब ही सोसायटी व विकासक यांची अंतर्गत बाब असून महानगरपालिकेच्या अखत्यारीतील नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.